# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार

दि.१२/०८/२०२४

**मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण योजना**
**बँक खाते आधार सिडींग करणेबाबत**

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील "मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण" योजनेकरीता अर्ज केलेल्या सर्व लाभार्थींना जाहीर आवाहन करण्यात येते की, आपण अर्जात नमूद केलेले बँक खाते हे आधार सिडेड (Aadhar Seeding) आहे कि नाही याची खात्री करून घ्यावी. बँक खात्याला आधार सिडींग केलेले नसल्यास तात्काळ आपले खाते ज्या बँकेत / पोस्ट खाते आहे अशा बँकेत / पोस्ट ऑफीसमध्ये जाऊन आधार सिडींग करून घ्यावे.

DBT द्वारे थेट लाभ हस्तांतरणासाठी सदरची बाब अनिवार्य आहे. ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत या योजनेच्या लाभासाठी अर्ज करण्याची मुदत आहे. ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत Online अर्ज केला तरी सर्व पात्र लाभार्थींना जुलै २०२४ पासून दरमहा १५००/- रुपये लाभ मिळणार आहे.

०१ जुलै ते ३१ जुलै २०२४ पर्यंत अर्ज केलेल्या पात्र लाभार्थींना १७ ऑगस्ट, २०२४ रोजी थेट DBT द्वारे त्यांच्या आधार सिडेड बँक खात्यात / पोस्ट खात्यात जुलै, ऑगस्ट असे ०२ महिन्याचा लाभ जमा होणार आहे. ०१ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट दरम्यान प्राप्त अर्जांची छाननी होऊन सप्टेंबर २०२४ अखेर पर्यंत पात्र लाभार्थींना योजनेचा लाभ देण्यात येईल.

मुख्य कार्यालय विरार
वसई विरार शहर महानगरपालिका